CNR NO-MHSO060020502017

नियमित दिवाणी दावा क्र. ११२/२०१७
जुना आर.सी.एस.क्र. ४५२/२०११
योगिता भोसले.
वि.
रामचंद्र भोसले व इतर.

## नि. ७४ वरील आदेश
## (घोषित दि. ०७/०४/२०२३)

०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ यांनी दाखल करुन त्यांच्या विरुध्द झालेला 'दावा विना कैफियत' चालविण्याबाबतचा आदेश रद्द करुन दाखल करण्यात आलेली कैफियत स्वीकारण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादी क्र. ५ यांनी असे नमुद केले की, दावा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल करण्यात आलेला नाही. त्या मौजे. वडापूर, ता. इंदापूर, जि पुणे येथील रहिवाशी असून त्यांना लहान मुल आहे. दावा मिळकती संदर्भात आवश्यक ती कागदपत्रे वेळेत प्राप्त न झाल्यामुळे तथा वकिलांशी संपर्क न झाल्यामुळे त्या मुदतीत आपली कैफियत सादर करु शकलेल्या नाहीत. मध्यंतरी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शासकीय व न्यायालयीन कामकाज देखील बंद होते. दावा हा स्थावर मिळकतीबाबतचा असून त्यामध्ये त्यांचे मौलिक हक्क गुंतलेले आहेत सबब त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. अर्ज मंजूर झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही परंतु अर्ज नामंजूर झाल्यास त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] वादीतर्फे अर्जास विरोध करुन असे नमुद करण्यात आले की, कैफियत दाखल करण्यास किती विलंब झाला त्याबाबत कोणताही खुलासा न करता मोघमपणे अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. नि.क्र. ७ अनुसार प्रतिवादी क्र. ५ यांना दि.२३/०२/२०२२ रोजी दाव्याचे समन्स प्राप्त झालेले असून दहा वर्षांचा विलंब झालेला आहे. कोरोनाचा कालावधी हा मार्च २०२० नंतर सुरु

झालेला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करणे झाल्यास रु.५०००/– खर्च लावण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०४] उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०५] वादीने मौजे. भंडीशेगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथे मिळकतीबाबत सरसनिरस मानाने वाटप होवून स्वतंत्र कब्जे मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. ५ ही तिच्या मयत पतीची बहिण आहे. प्रतिवादी क्र.५ यांना दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर त्या दि.१६/०८/२०१३ रोजी न्यायालयामध्ये हजर झालेल्या आहेत. प्रतिवादी क्र. ५ यांनी विहित मुदतीत आपली कैफियत सादर न केल्यामुळे दि.२८/११/२०१३ रोजी त्यांचे विरुध्द दावा विना कैफियत चाविण्याबाबतचा आदेश पारीत झालेला आहे. सदरचा आदेश रद्द करण्याकरीता प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज दहा वर्षांच्या विलंबाने दाखल केलेला आहे.

०६] अर्जामध्ये नमुद केलेली कारणे ही अत्यंत मोघम स्वरुपाची असून कोरोनाबाबत केलेली विधाने अर्जदाराला कोणतेही सहाय्य करीत नाहीत. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास दहा वर्षांचा विलंब झालेला आहे. महत्वाची बाब म्हणजे वादीने दाव्यात वाटप करुन मागितलेले आहे व वाटपाच्या दाव्यामध्ये वादी तथा प्रतिवादी हे वादी म्हणूनच गणले जातात. दावा मिळकत ही अचल संपत्ती असून त्यामध्ये उभयपक्षांचे मौलिक हक्क गुंतलेले आहेत. दुसरी महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र. ५ यांनी जरी विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असला तरीही दाव्याचे कामकाज हे अजुनही साक्षपुराव्याकरीताच प्रलंबित आहे. वादीतर्फे नुकतेच सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दाखल झालेले असून त्यावर पुढील सरतपास व उलटतपास घेणे बाकी आहे. एकंदरितच प्रतिवादीतर्फे दाखल अर्जाला जरी दहा वर्षांचा विलंब झाला असला तरीही दाव्याचे कामकाज लांबले किंवा अर्ज मंजूर केल्यास दाव्याची फेर–सुनावणी होईल अशी परिस्थीती नाही. एकंदरितच

उभयपक्षांतील नातेसंबंध, दाव्यात केलेली मागणी, उभयपक्षांचे वादमिळकतीमध्ये गुंतलेले मौलिक हक्क लक्षात घेता तथा दावा गुणदोषांवर निकाली काढून उभयपक्षातील वाद कायम स्वरुपी संपुष्ठात आणण्याकरीता प्रतिवादी क्र. ५ यांना आपली कैफियत सादर करण्याची संधी देणे न्यायोचित असल्याचे माझे मत झाले आहे. असे करीत असताना वादीवर देखील अन्याय होता कामा नये त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ विरुध्द झालेला आदेश रद्द करताना वादीला रक्कम रु.५०००/– मंजूर करणे संयुक्तीक होईल. वरील सर्व विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज रक्कम रु.५०००/- खर्चासह मंजूर करण्यात आला.

२] प्रतिवादी क्र. ५ यांनी खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्यांची कैफियत पटलावर घेण्यात यावी.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2023.04.07 17:26:18 +0530

**दि.०७/०४/२०२३.**

**(अमित अ.खंडाळे)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | $2^{nd}$ Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 07.04.2023 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 07.04.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 07.04.2023 |